महाराष्ट्र पोलीस

# पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर

नविन प्रशासकीय इमारत, गांधीनगर

सोलापूर 413 003

ई मेल :- cp.solapur@mahapolice.gov.in        दुरध्वनी क्र. 0217 2744613 फॅक्स नं.0217 2744618

जा.क्र.कक्ष 1(4)/ कैदीभत्ता /दरपत्रक/2022 546        सोलापूर शहर दि. 11 / 04 /2022

**विषय :- कच्चे कैदी यांना जेवण पुरविणेबाबतच्या वार्षिक निविदा मागविण्याची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

--oo--

**आदेश :-**

सोलापूर शहरातील,सर्व अधिकृत खानावळ/उपहारगृह चालक यांना कळविण्यात येते कि, या आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीत कच्च्या कैदेतील आरोपींना दिनाक **०१/०४/२०२२** ते दि. **३१/०३/२०२३** या कालावधीत दोन वेळेचे शिजविलेले अन्न पुरविणेबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

बंदी कैद्यांना दोन वेळेस पुरविण्याबाबतच्या अन्नाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | प्रमाणे प्रति दिनी आहार (ग्रम) |
|---|---|---|
| १ | गव्हाची चपाती किंवा ज्वारीची भाकरी | ७५० ग्रॅम |
| २ | दाळ | १५० ग्रॅम |
| ३ | भाजी | २०० ग्रॅम |
| ४ | आठवडयातुन एक वेळेस दाळे / भाजी ऐवजी मटन | १५० ग्रॅम |
| ५ | आजारी कैद्यास जेवणा ऐवजी दुध | १ लिटर दुध |
| ६ | स्त्री आरोपीस तीन वर्षाखालील मुल असल्यास वरील जेवणाशिवाय दुध | १/२ ते १ लिटर दुध |

**सदर दरपत्रकांचा नमुना सोबत जोडलेला आहे.** त्या मधील नमुद प्रमाणे अचुक माहिती भरुन प्रतिदिन व प्रतिडोई ( **दोन वेळेसच्या दरासह** ) रक्कम रु.80/-आतील प्राप्त दरामधून कमी दराचे दरपत्रक स्विकृत करण्यात येतील. सर्व सविस्तर माहीती **सर्व परवाने व आवश्यक कागदपत्रांच्या** छायांकित प्रती सोबत जोडुन सिलबंध लखोटयात **दिनांक 18 /04/2022 रोजी 05.00 वा पर्यंत पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आवक शाखा येथे समक्ष दयावात.** प्राप्त दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक नाकारल्याबाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**( डॉ.दिपाली धाटे)**
पोलीस उप-आयुक्त, (मुख्या)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे करीता.

प्रति, पोलीस निरीक्षक, सायबर सेल पोलीस ठाणे, सोलापूर शहर.

2/- यांनी सदरची प्रत कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करावी.

**पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीस कच्चा कैदेतील आरोपींना दि.01.04.2022 ते 31.03.2023**
**या कालावधीत दोन वेळेचे शिजवलेले अन्न पुरविण्याबाबतचे दरपत्रकाचा विहीत नमुना.**

दि.     .04.2022

प्रति,

मा. पोलीस आयुक्त,
सोलापुर शहर.

महोदय,

मी श्री / श्रीमती -------------------------------------------------------------------------------------------
दरपत्रक सादर करतो की, आपल्या अधिपत्याखाली पोलीस ठाण्यामधील कच्चा कैदेतील आरोपींना दि. 01.04.2022 ते 31.03.2023 या कालावधीत दररोज एका आरोपीस दोन वेळचे शिजविलेले अन्न पुरविण्याबाबतचे जाहिराती स अनुसरुन त्यामध्ये नमूद केलेल्याप्रमाणे प्रतिदीन/प्रतिडोई दोन वेळेस रु.--------- /- (अक्षरी ------------------------------------------------------------- ) या दराने अन्न पुरवठा करण्यास तयार आहे.

२/- सदरचा अन्न पुरवठा करण्यासंबधच्या सर्व अटी मला मान्य असुन त्या मला बंधनकारक आहेत. त्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही.

१. मी कोणतीही तक्रार न करता वर नमुद केलेला कालावधीमध्ये विहीत केलेल्याप्रमाणे प्रति दिन योग्य प्रकारे शिजविलेले अन्न मुंबई सब जेल मॅन्युअल (सुधारीत आवृत्ती १९५४) नियम क्र. १६२ प्रमाणे पुरवठा करीन.
२. माझे दरपत्रक स्विकारली गेल्यास मी प्रत्येक पोलीस ठाण्याप्रमाणे अनामत रक्कम रुपये १०००/- (अक्षरी एक हजार फक्त ) ही वेगवेगळी आगाऊ भरण्यास तयार आहे.
३. माझ्याकडे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९६१ नियम ६ अन्वये नोंदणी दाखल असून त्याची छायांकित प्रमाणित प्रत सोबत जोडलेली आहे.
४. मी आरोपींना दिलेल्या कालवधीम प्रमाणाप्रमाणे आरोपींना जेवण वेळेवर पुरविले नाहीतर रु. १००/- दंड करण्यात येईल याची मला जाणीव आहे.
५. माझेकडून अन्न पुरवठा करणेसंबधी पोलीस ठाण्याकडुन तक्रार प्राप्त झालेस माझे दरपत्रक रद्द होईल व मी भरलेली रक्कम सरकार जमा होईल याची मला पूर्ण जाणीव आहे.
६. माझेकडे मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचेकडून घेतलेला हॉटेल परवाना असून तो दिनांक.   /   /   पर्यंत नुतनीकरण करून घेतलेला आहे. त्याची छायांकित प्रमाणित प्रत जोडलेली आहे.
७. मला शिजविलेले अन्न पोलीस ठाण्यातील कैदयांना पुरविण्यासंबधीचा ----------वर्षाचा अनुभव आहे.
८. दरपत्रक स्विकारण्याचे व नामंजूर करण्याचे अधिकार हे पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय) यांना आहेत याची मला जाणीव आहे.

सोबत :- एकुण ---------कागदपत्रे जोडलेली आहेत.

आपला विश्वासु